# जुन्नरची स्वराली 'प्रज्ञाशोध'मध्ये राज्यात चौथी

## एमटीएस व एनएमएमएस परीक्षेत बुट्टे पाटील विद्यालयाचे यश

जुन्नर, दि. २७ (वार्ताहर) - नोव्हेंबर २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृती परीक्षा (एनएमएमएस) व एप्रिल २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध (एमटीएस) परीक्षेत जुन्नर येथील शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर उज्ज्वल यश संपादन केले असल्याची माहिती बाह्यपरीक्षा विभाग प्रमुख अनिल उंडे यांनी दिली.

विद्यालयातील इयत्ता ९ वीतील स्वराली शंकर ढोबळे ही विद्यार्थिनी एमटीएस



**जुन्नरः येथील शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करताना मान्यवर.**

परीक्षेत राज्यात चौथी आली असून एनएमएमएस परीक्षेत विद्यालयातील वरद थोरात, तेजस रेंगडे, नीरज परदेशी, मानसी गवळी या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी राज्यस्तरावर निवड झाली आहे.

दरम्यान, यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी, उपाध्यक्ष संजय बुट्टे पाटील, कार्याध्यक्ष दिलीप ढमढेरे, सचिव विजय ताथेड, सहसचिव धनेश संचेती, संचालक डॉ. प्रमिला जुन्नरकर, ॲड. सुधीर ढोबळे, ॲड. शरद गुरव, रमेश खत्री, उदय पुंडे, संजय मुथा, सुहास भगत, प्राचार्य रा. प. सबनीसचे मुख्याध्यापक आनंदा कांबळे, विलास पानसरे, संजय जोशी, ज्येष्ठ शिक्षक एम. एस. पिसे, संजय खराडे, विनय रावळ, प्रफुल्ल बोऱ्हाडे यांनी अभिनंदन केले.

### गौरवशाली परंपरा कायम - जोशी

यंदाही एनएमएस, एनएमएमएस परीक्षेत शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयाने जुन्नर तालुक्यात प्रथम क्रमांकावर राहून निकालाची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. शिक्षकांच्या प्रयत्नासोबत विद्यार्थ्यांनी केलेल्या कष्टाचे फळ त्यांना मिळाले आहे. करिअरच्या दृष्टीने ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची असून वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांचा सामना करणे या परीक्षेमुळे सहज शक्य होते.



जुन्नरच्या शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयातील यशस्वी झालेले विद्यार्थी, संस्थेचे पदाधिकारी आणि मार्गदर्शक शिक्षकवर्ग.

# प्रज्ञाशोध परीक्षेत स्वराली राज्यात चौथी

**ओझर :** नोव्हेंबर २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती व एप्रिल २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत जुन्नरच्या शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर उज्ज्वल यश संपादन केले असल्याची माहिती बाह्यपरीक्षा विभागप्रमुख अनिल डुंडे यांनी दिली. इयत्ता ९ वी तील विद्यार्थिनी स्वराली शंकर ढोबळे ही महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात ४ थी आली असून, राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील वरद थोरात, तेजस रेंगडे, नीरज परदेशी, मानसी गवळी या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी राज्यस्तरावर निवड झाली आहे.